स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

कला विद्या शाखा अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या संशोधन प्रबंधाची स्थुल रुपरेषा

रंगनाथ पठारे यांचे कथालेखन : विविधांगी अभ्यास

संशोधक

केशव विठ्ठल कोकाटे

(एम.ए.मराठी नेट)

email.id-kkokate०२@gmail.com

mob no-९७६५३५२३४६

मार्गदर्शक

प्राचार्य

डॉ.नागनाथ पाटील

योगानंद महाविद्यालय

वसमत जि.हिंगोली

emailid-patilnagnathr@gmail.com

mob no-९४२२१८७९६८

मे.२०१७

प्रास्ताविक :

कथा ऐकण्याची व सांगण्याची आवड मानवाला फार पुर्वीपासुन आहे.कथा हा वाड्मय प्रकार सुरुवातीला मौखीक स्वरुपातुन व्यक्त झाल्याचे दिसुन येते.मध्ययुगीन काळात महानुभवीय साहित्यातील लिळाचरित्रातुन मौखीक कथाची विविध रुपे प्रकट झालेली आहेत. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकारामाची अभंग गाथा इत्यादीसारख्या संत साहित्यातील ग्रंथातुनही पौराणिक कथा दृष्टांताच्या रुपाने आविष्कृत झाल्याचे दिसुन येते. मध्ययुगीन वाड्मयातुन अभिव्यक्त झालेली कथा हि पौराणिक,ऐतिहासिक, चारित्रात्मक स्वरुपाची असल्याची दिसते. कथा वाड्मय प्रकाराची पाया भरणी मध्ययुगीन वाड्मयातुन झ ाल्याचेदिसते परंतु कथेला वाड्मय प्रकार म्हणुन मान्यता मिळाल्याचे दिसत नाही.

ब्रिटिश भारतात आल्यानंतरचा कालखंडहा आधुनिक कालखंड समजला जातो.या कालखंडात कथा वाड्मय प्रकार रुढ झाल्याचा दिसतो मौखिक स्वरुपातील कथा या काळात मुद्रीत स्वरुपात यायला लागल्या.भाषांतरीत कथांचे पिक या काळात जोमात येऊ लागल्यानेहा काळ 'भाषांतर युग' म्हणुन ओळखल्या जाऊ लागला. भाषांतरामुळे या कथांना स्वत:चे रुप आणि भाव नसल्यामुळे या काळातील जीवन दर्शन घडविण्यात ती असमर्थ ठरली १८९० सालापासुन 'करमणुक' मासिकातुन कथा लेखनास सुरुवात करणाऱ्या हरिभाऊ आपटे यांनी कथेला अदभुत रम्यतेतुन वास्तवात आणले ना.सि.फडकेयांनी कथेत तंत्र शुध्दता आणली. रचनेमध्ये निरगाठ, गुंतागुंत, उकल असण्याकडे लक्ष देत लालित्यपुर्णता आणली परंतु बाह्य अंगावरच विशेष लक्ष दिल्याने आशयाकडे दुर्लक्ष झाले.खांडेकर यांनी मात्र कथेला सामाजिक आशयाची जोड देऊन तिला जीवनाभिमुख बनविले. गाडगिळ, गोखले, भावे,माडगुळकर या नव कथाकरानी कथेमध्ये अंतर्बाह्य बदल घडवुन आणला. मानवी जीवनाचे सुक्ष्मातिसुक्ष्म दर्शन घडविले परंतु नवकथेमध्येतोचतो पणा येऊन तिला एक साचेबंध रुप लाभले.१९६० नंतर मराठीसाहित्यात अनेक प्रवाह उदयाला आले.साठोतरी कथा हि ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी इत्यादींसारख्या प्रवाहातुन वाटचाल करीत पुढे यायला लागली.१९७७ पासुन लेखणास सुरुवात करणारेरंगनाथ पठारेहे मराठीसाहित्यातील एक सशक्त, जबरदस्त सामर्थाचे महत्वाचे लेखक आहेत. साहित्याच्या अनेकविध प्रकारातुनत्यांनी मौलीक अशा स्वरुपाचे लेखन केलेले आहे अशा विविध प्रकारातुन जरी लेखन केलेले असलेतरी कोण्या एका

प्रवाहात ते अडकुन पडल्याचे दिसत नाही.हे त्यांच्या कथेचे वेगळेपण लक्षात घेऊन त्यांच्या कथा लेखनावर संशोधन करण्याचे ठरविले आहे.

अभ्यास विषयाची निवड

प्राचीन काळापासुन आजतागायत कथा लेखनाची परंपरा अव्याहातपणे सुरु आहे आजही कथेबाबतचे आकर्षण कमी झालेले दिसत नाही. कविता, कादंबरी, नाटक, चारित्र, आत्मचरित्र,प्रवास, वर्णन या वाङ्मय प्रकारा प्रमाणेच कथाहा वाङ्मय प्रकारलोकांना जवळचा वाटतो. अनेक कथा लेखक वेगवेगळ्या नियतकालीकातुन कथा लेखन करतांना दिसतात.त्याला रंगनाथ पठारेअपवाद नाहीत यांचे आठ कथासंग्रह प्रसिध्द आहेतत्यांनी अनेक नियतकालीकामधुन कथा लेखन केलेले आहे.उदा. अनुष्टुभ, हंस, युवकमुद्रा, आयुध, रसिक, दिशा, उगवाई, बखर, अक्षर, साधना प्रतिष्ठाण, स्त्रग्धरा, शब्द, दिपोत्सव या सारख्या काही नियतकालीकांचा या ठिकाणी जाणिवपुर्वक उल्लेख करता येईल त्यांच्या कथा आठसंग्रहामधुन प्रकाशित झालेल्या आहेत. त्यांच्या कथेचा वाचक वर्ग ही मोठ्या संख्येने दिसतोत्यामुळे रंगनाथ पठारे यांच्या समग्र कथा लेखनांचा एकत्रितपणे अभ्यास करावा म्हणुन या विषयाची निवड केली आहे.

रंगनाथ पठारे यांच्या लेखनावर भालचंद्र नेमाडे यांचा प्रभाव पडलेला आहे.परंतु नेमाडे यांनी कथा वाङ्मय प्रकाराला गौण स्थान दिलेले आहे.याच्या उलट रंगनाथ पठारे यांनी मात्र कथा लेखनाला गौण स्थान न देता अधिक प्रमाणामध्ये कथा लेखन केलेले दिसते.या मागचे रहस्य नेमके कोणते असु शकते याचे कारण मिमांसा यथार्थपणे व्हावी म्हणुन रंगनाथ पठारे यांच्या कथा लेखनाचा विविध अंगी अभ्यास करण्याचे ठरविले आहे.कथा या वाङ्मय प्रकाराची उंची कमी नाही याचा प्रत्यय रंगनाथ पठारे यांच्या कथा वाचतांना आल्याशिवाय राहत नाही.समकालीन कथाकारापेक्षात्यांचे कथा लेखन वेगळे आहे याचा शोध घेण्यासाठी या अभ्यास विषयाची निवड केलेली आहे.

संशोधनाची गृहितके व उद्दिष्टे

१) रंगनाथ पठारे यांच्या कथा लेखनाचा विविध अंगी अभ्यास करणे.

२) वाङ्मय इतिहासात रंगनाथ पठारे यांच्या कथा लेखनाचे स्थान कोणते याचा शोध घेणे.

३) समकालीन कथाकारामध्ये यांचे कथालेखन कसे वेगळे आहेते शाधणे.

४) पठारे यांच्या कथेतुन प्रकट झालेली आशय सुत्रे यांचा अभ्यास करणे

उद्दिष्टे

१) समकालीन कथा लेखकामध्ये रंगनाथ पठारे यांचे वेगळेपण स्पष्ट करणे.

२) रंगनाथ पठारे यांचे कथा लेखन बहुपेढी व बहुआयामी असल्याने त्यांच्या कथालेखनाचा विविध अंगी अभ्यास करणे.

३) रंगनाथ पठारे यांच्या कथालेखनातुन एकच एक आशय प्रकट झालेला दिसत नाहीतर अनेक आशय सुत्रे प्रकट झालेली दिसतात त्यांचा शोध घेणे.

४) रंगनाथ पठारे यांची कथा प्रयोगशील असल्याने तिचे इतर लेखकापेक्षा असणारे निराळेपण लक्षात येते त्याचा शोध घेणे.

५) रंगनाथ पठारे यांच्या कथा लेखनाची भाषा शैली जाणुन घेणे.

६) रंगनाथ पठारे यांचा जीवन विषयक दृष्टिकोण लक्षात घेणे.

संशोधनाचीपध्दत

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पध्दती अवलंबली जाणार आहे.संशोधनासाठी प्रश्न निश्चित करुन त्यासाठीची साधन सामुग्री जमा करणे आणि चिंतन करुन निष्कर्षा प्रत पोहचण्याचे ठरविले आहे. रंगनाथ पठारे यांच्या कथालेखना बरोबरच इतर लेखकांच्या समिक्षणात्मक संदर्भ ग्रंथाचा मागोवा घेण्याचे मागोवा या ठिकाणी घेण्यात येणार आहे. याशिवाय रंगनाथ पठारे यांची ध्वनी मुद्रीत मुलाखत घेण्यात येणार आहे.

संशोधनाचे महत्व

मराठीसाहित्यात ८० च्या दशकातले रंगनाथ पठारेहे महत्वाचे साहित्यिक आहेत. कथा,कादंबरी, समीक्षापर अनेक ग्रंथ त्यांच्या नावाने प्रसिध्द आहे. 'अनुभव विकणे आहेत', 'स्पष्ट वक्तेपणाचे प्रयोग', 'ईश्वर मृत्यास शांती देवो', 'गाभ्यातील प्रकाश', 'चित्रमय चतकोर', 'तिव्र कोमल दुखाचे प्रकरण', 'शंखातील माणुस'हेत्यांचे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.समाजमुल्याचे भान असणाऱ्या, वास्तवाला भिडणाऱ्या अनुभवाच्या कक्षा रुंदावणाऱ्या कथा रंगनाथ पठारे यांनी मराठीसाहित्य विश्वाला दिलेल्या आहेत.कथेच्या कथानकापासुन ते शैलीपर्यंत अनेक विविध संरचनात्मक घटकांची देणंत्यांनी मराठी कथा विश्वाला बहाल केलेली आहे.वर्तमानाचा अचुकवेध, प्रयोगशीलता, आशयातील वैविध्य इत्यादी त्यांच्या कथांची वैशिष्टे सांगता येतील. यांचा शोध या प्रबंधातुन घेतल्या जाणार आहे.मराठी कथासाहित्य अभ्यासकास मदतठरेल असा हा विषय आहे.म्हणुन या विषयाचे महत्व वाटते.

संशोधन प्रबंधाची रुपरेषा

प्रकरण पहिले : मराठी वाड्मयाच्या इतिहासात कथा वाड्मयाचे स्थान, परंपरा व वाटचाल

१) कथा म्हणजे काय ? कथेच्या विविध व्याख्या.

२) कथेचे मौखीक आणि लिखित स्वरुप

३) प्राचीन,मध्ययुगीन वाड्मयातील कथेचा आकृतीबंध

४) आधुनिक वाड्मयात बदल झालेली कथा.

५) वाड्मयाच्या इतिहासात कथा वाड्मयाचे निराळेपण.

६) कथा वाड्मय प्रकाराच्या विकासाची टप्पे.

प्रस्तुत प्रकरणामध्येवरिल घटकांचा विचार करावयाचा आहे.

प्रकरण दुसरे : रंगनाथ पठारे यांचेसमकालीन कथाकारापेक्षा वेगळेपण.

१) साठोत्तरी कथा वाड्मयाचे स्वरुप

२) रंगनाथ पठारे यांचेसमकालीन कथाकार

३) रंगनाथ पठारे यांचे कथा वाड्मयातील स्थान

४) रंगनाथ पठारे यांच्या कथालेखनाचास्थुलपणे परिचय

५) रंगनाथ पठारे यांचे मराठी कथेला मिळालेले योगदान

६) रंगनाथ पठारे यांचेसमकालीन कथेपेक्षा निराळपण

प्रस्तुत प्रकरणामध्येवरिल घटकांचा विचार करावयाचा आहे.

प्रकरण तिसरे : रंगनाथ पठारे यांच्या कथेतील आशयाचे स्वरुप

१) रंगनाथ पठारे यांच्या कथेची निर्मिती प्रक्रिया

२) रंगनाथ पठारे यांच्या कथांचे वर्गीकरण

३) रंगनाथ पठारे यांच्या कथेत आलेले विषय

४) रंगनाथ पठारे यांच्या कथेतील समाज वास्तव चित्र

५) रंगनाथ पठारे यांच्या कथेतीलस्त्री, पुरुष व्यक्ती रेखांचे चित्र

६) रंगनाथ पठारे यांच्या कथेतुन प्रकटहोणारी आशय सुत्रे

प्रस्तुत प्रकरणामध्येवरिल घटकांचा विचार करावयाचा आहे.

प्रकरण चौथे : रंगनाथ पठारे यांच्या कथा लेखनातील अभिव्यक्ती कौशल्य

१) रंगनाथ पठारे यांच्या कथेचे रचनातंत्र

२) रंगनाथ पठारे यांच्या कथेतील निवेदन पध्दती

३) रंगनाथ पठारे यांच्या कथेतील संवादाचे स्वरुप

४) रंगनाथ पठारे यांच्या कथेतील प्रयोग शिलता

५) रंगनाथ पठारे यांच्या कथेची भाषा शैली व शब्दकळा

प्रस्तुत प्रकरणामध्येवरिल घटकांचा विचार करावयाचा आहे.

प्रकरण पाचवे : रंगनाथ पठारे यांच्या कथा लेखनाचे मूल्य मापन

१) रंगनाथ पठारे यांच्या कथेतील आशयाचे निराळेपण

२) रंगनाथ पठारे यांच्या कथेतील कथाबिज व विकास

३) रंगनाथ पठारे यांच्या कथेचा प्रारंभ व शेवट

४) रंगनाथ पठारे यांच्या कथांची परिणामकारक शिर्षके

५) रंगनाथ पठारे यांच्या कथेतील वातावरण निर्मिती

६) रंगनाथ पठारे यांच्या कथेतील विचारसौदर्य व कल्पकता

प्रस्तुत प्रकरणामध्येवरिल घटकांचा विचार करावयाचा आहे.

प्रकरणसहावे निष्कर्षः

रंगनाथ पठारे यांच्या कथांचा वरिल प्रकरणातुन अभ्यास केल्यानंतर जे निष्कर्षसंशोधनाच्या अंतीहाती येतात त्यांचा उहापोह निष्कर्षाच्या अंतीम प्रकरणात करावयाचा आहे.

संदर्भ ग्रंथ सूची -:

१. मराठी कथाः उगम आणि विकास , इंदुमती शेवडे, सोमय्या प्रकाशन मुंबई

२. कथा : संकल्पना आणि समीक्षा, डॉ.सुधा जोशी, मुंबई विद्यापीठ आणि मौज प्रकाशन गृह, मुंबई

३. निवडक रंगनाथ पठारे - कोंभालगतचा प्रवास, (सं.) एकनाथ पगार, लोक वाड्मय गृह, पुणे

४. साहित्य आणि सांस्कृतिक संवेदन, प्रभाकर बागले, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर

५. साहित्याचा स्वभाव, गो.म.कुलकर्णी, पद्मगंदा प्रकाशन, पुणे

६. आस्थेचे प्रश्न, रंगनाथ पठारे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर

७. तिरकस पणातीलसरळता, संपादक राजन गवस शब्दालय प्रकाशनश्रीरामपुर

८. सत्वाची भाषा, रंगनाथ पठारे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर

९. प्रश्नांकित प्रदेश, रंगनाथ पठारे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर

१०. साहित्याची सामाजिकता, प्रा.डॉ.सतिष बडवे रंगनाथ पठारे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर

११. प्रदक्षिणा खंड एक (संपा.) अनिल कुलकर्णी, कॉन्टीनेटल प्रकाशन पुणे

१२. प्रदक्षिणा खंड दोन (संपा.) अनिल कुलकर्णी, कॉन्टीनेटल प्रकाशन पुणे

१३. वाङ्मयीन चळवळी आणि दृष्टीकोण (संपा) सुमती लांडे, शब्दालय प्रकाश, श्रीरामपुर

१४. टिकास्वयंवर, भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन औरंगाबाद

१५. ग्रामीण तथा स्वरुप आणि विकास, वासुदेव मुलाटे, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद

१६. अनुभव विकणे आहेत, रंगनाथ पठारे, विश्वमोहीमी प्रकाशन, पुणे

१७. स्पष्ट वक्तेपणाचे प्रयोग, रंगनाथ पठारे, साकेत प्रकाशन,औरंगाबाद

१८. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो, रंगनाथ पठारे, शब्दालय प्रकाशन,श्रीरामपुर

१९. गाभ्यातील प्रकाश, रंगनाथ पठारे, मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई

२०. चित्रमय चतकोर,रंगनाथ पठारे,शब्दालय प्रकाशन,श्रीरामपुर

२१. तीव्र कोमल दु:खाचे प्रकरण, शब्दालय प्रकाशन,श्रीरामपुर

२२. शंखातील माणुस, रंगनाथ पठारे, मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई

२३. रंगनाथ पठारे यांच्या साहित्यातीलस्त्री दर्शन, राजेंद्रसलालकर, शब्दालय प्रकाशन,श्रीरामपुर

नियतकालिके मासिके

१. अक्षरवैदर्भी, दिपावली विशेषांक , २०१५

२. ललित ऑगष्ट २०१३

३. स्त्रग्धराऑगष्ट सप्टेंबर २००२

संशोधक विद्यार्थी
केशव विठ्ठल कोकाटे
एम.ए.मराठी (नेट)

मार्गदर्शक
प्राचार्य
डॉ.नागनाथ पाटील
योगानंद महाविद्यालय वसमत
जि.हिगोली